# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

माहितीचा अधिकार

तक्रार क्रमांक- १२००+१२०१/२०२३,१०८७-२०२४ /कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ
पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलिय अधिकारी तथा |
| दिगंबर धोंडीराम घोरपडे | डेप्युटी रजिस्ट्रार, डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर. | डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर. |

(निर्णय दिनांक- ११.८.२०२५ )

तक्रारदार यांचे कलम-१८ अंतर्गत तक्रार अर्ज दि. ११.१२.२०२३ व दिनांक-२८.८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाले आहेत. तक्रारदार यांनी या तक्रार अर्जाद्वारे द्वितीय अपील क्र. १८९७+३३३२-२०२४ कोल्हापूर या प्रकरणी आयोगाचे आदेशाची अंमलबजावणी करावी तसेच द्वितीय अपील क्र. ४५०-२०२४ कोल्हापूर या प्रकरणी आयोगाचे आदेश रद्द करण्याची अशी मागणी केली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ४२५३-२०२४ प्रकरणी दि. २.९.२०२४ चे अंतिम आदेशान्वये याचिकाकर्ते यांची त्यांना माहितीचा अधिकार कायदा लागू नसल्याची मागणी मान्य केली असून, द्वितीय अपील क्र. १८९७+३३३२-२०२४ कोल्हापूर या प्रकरणी आयोगाने दिनांक १८.१०.२०२३ रोजी पारित केलेले आदेश अमान्य केले आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे सदर रिट याचिकेवरील दि. २६.३.२०२४ चे स्थगितीचे आदेश विचारात घेवून द्वितीय अपील क्र. ४५०-२०२४ कोल्हापूर या प्रकरणी आयोगाने द्वितीय अपील निकाली काढले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ४२५३-२०२४ प्रकरणी दिलेले निर्देश विचारात घेता तक्रारदार यांनी आयोगास कलम १८ अंतर्गत सादर केलेल्या तक्रार अर्जावर आयोगाचे स्तरावर कार्यवाही अपेक्षित नाही. या तक्रार प्रकरणी आयोगाचे खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

तक्रारदार यांचे तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक-१२००+१२०१/२०२३,१०८७-२०२४ /कोल्हापूर 8988/2025 दिनांक 11/8/2025